महाराष्ट्र शासन

022-22025999

E-Mail-trans4.home@maharashtra.gov.in

क्र.एमव्हीडी-0217/प्र.क्र. 41/परि-4
गृह विभाग मंत्रालय
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई- 400032.
दिनांक. 13 फेब्रुवारी, 2017

**अतितात्काळ/कालमर्यादा**

15 FEB 2017

प्रति,

परिवहन आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय: सन 2017 मध्ये (निवडसूची 2016) भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्ती करण्यासाठी अधिका-यांची शिफारस करण्याबाबत.**

संदर्भ: सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.एआरएस-1317/प्र.क्र.45/2017/दहा,दिनांक 04.02.2017

उपरोक्त विषयाबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन पत्राची प्रत सहपत्रांसह सोबत जोडली आहे.

सदर पत्रात नमूद केल्याप्रमाणे सन 2017 मध्ये (निवडसूची 2016) भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्ती करण्यासाठी मोटार वाहन विभागातील पात्र अधिका-यांची माहिती विहित प्रपत्रानुसार दिनांक 23.02.2017 पर्यंत शासनास सादर करावी अशी विनंती आहे.

(टि.न.शिखरामे)
कक्ष अधिकारी, गृह विभाग,महाराष्ट्र शासन

सहपत्र: वरीलप्रमाणे

**महाराष्ट्र शासन**

कालमर्यादा

क्र.-एआयएस-१३१७/प्र.क्र.४५/२०१७/दहा,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०४.०२.२०१७

प्रति,

अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग.

विषय :-सन-२०१७ मध्ये (निवडसूची २०१६)भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्ती करण्यासाठी अधिका-यांची शिफारस करण्याबाबत.

संदर्भ :- (i)वित्त विभाग शासन निर्णय क्र. अरजा-२४०२/२५/सेवा-८, दि. ०७.१०.२००२
(ii)सा.प्र.वि.,शासन निर्णय क्र.एआयएस १३१७/प्र.क्र.४५/२०१७/दहा, दि.०४.०२.२०१७

महोदय / महोदया,

सन २०१७ मध्ये भारतीय प्रशासन सेवेत बिगर राज्य नागरी सेवेतील अधिका-यांची निवडीने नियुक्ती करण्यासाठी निवडसूची २०१६ करिता दोन पदे उपलब्ध आहेत. निवडसूची २०१६ करिता बिगर नागरी सेवेतून (NON-SCS) भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्तीच्या शिफारशीसाठी पात्रता निकष (Benchmark criteria) या विभागाच्या संदर्भाधीन क्र. २ येथे नमूद दि. ०४.०२.२०१७ च्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आलेले आहेत. आपल्या प्रशासकीय नियंत्रणाखालील विविध सेवांमधील सोबतच्या परिशिष्टअ- मध्ये नमूद केलेली पात्रता धारण करणा-या व क्रमांक एआयएस १३०४/प्र.क्र.४९१/२००४/दहा, दि.२४.१२.२००४ च्या अधिसूचनेन्वये उप जिल्हाधिकारी संवर्गाशी समकक्ष घोषित केलेल्या आपल्या विभागातील संवर्गातील विहित पात्रता निकष पूर्ण करणा-या अधिकाऱ्यांचा प्रस्ताव **दिनांक ३१.०३.२०१७ पर्यंत** या विभागाकडे (साप्रवि/कार्यासन १०) पाठविण्यात यावा ही विनंती. आपल्या विभागाची माहिती निरंक असल्यास तसेदेखील कळवावे.-

२. अधिका-यांच्या शिफारशींचा प्रस्ताव पाठविताना पुढील बाबींची पुर्तता करण्यात यावी :-

(१) सदर अधिका-यांची नावे व वैयक्तिक माहिती परिशिष्ट-३.१ मध्ये विहीत केलेल्या नमुन्यात देण्यात यावी. **दिनांक १ जानेवारी, २०१६** या दिनांकांस ज्या अधिका-याचे **वय ५६** वर्षापेक्षा जास्त नाही अशा अधिका-यांचाच समावेश असावा. यापूर्वी निवड झालेल्या काही अधिकाऱ्यांकडून केंद्र शासनाकडील अधिसूचनेत त्यांच्या जन्मदिनांकाची / नावाची नोंद बरोबर नसल्याचे निदर्शनास आणण्यात आले आहे. अशा स्वरुपाची प्रकरणे भविष्यात उद्‌भवू नयेत याकरीता प्रस्ताव पाठविताना अधिका-यांचा **जन्मदिनांक/नाव ही माहिती, सेवापुस्तक/उपलब्ध अभिलेखाप्रमाणे बरोबर नमूद करण्याची दक्षता घ्यावी व तसे प्रमाणपत्र देखील सोबत जोडावे.**

(२) **विभागीय तसेच न्यायालयीन चौकशी/फौजदारी कार्यवाही सुरू असलेल्या अधिका-यांच्या नावांची शिफारस करण्यात येऊ नये.**

(३) विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांबाबत मागील दहा वर्षाच्या कालावधीत त्यांना बजावलेल्या शिक्षेबाबतची माहिती परिशिष्ट ४.१ आणि परिशिष्ट-४.२ मध्ये विहित केलेल्या नमुन्यात देण्यात यावी.

(४) विचारक्षेत्रातील सर्व अधिका-यांचे सचोटी प्रमाणपत्र / ज्या अधिका-यांची सचोटी प्रमाणित केलेली नाही त्यांचे प्रमाणपत्र परिशिष्ट-५ मध्ये विहीत केलेल्या नमुन्यात देण्यात यावे.

(५) गोपनीय अहवालातील प्रतिकूल शे-यांबाबतची ३ प्रमाणपत्रे परिशिष्ट-६ मध्ये विहीत केलेल्या नमुन्यात देण्यात यावीत.

(६) विचारक्षेत्रातील अधिका-यांच्या गोपनीय अहवालांच्या उपलब्धतेबाबतची माहिती परिशिष्ट-७ मध्ये देण्यात यावी.

(७) निवड सूचीवर परिणाम करणा-या न्यायालयीन प्रकरणे आणि न्यायालयीन आदेशांची सविस्तर माहिती परिशिष्ट-८ मधील विहित नमुन्यात सादर करावी.

(८) सन २०१६ च्या निवडसूचीकरिता दि. ३१.०३.२०१६ पर्यंतचे मागील सलग १० वर्षांचे सर्व संस्करण पूर्ण होऊन अंतिम झालेले गोपनीय अभिलेखच विचारात घेण्यात यावेत.

(i) मागील १० दहा वर्षाचे (सन २००६-२००७ ते सन २०१५-२०१६) सर्व संस्करण पूर्ण होऊन (प्रतिवेदन व पुनर्विलोकन दोन्ही) अंतिम झालेले गोपनीय अहवालच विचारात घेण्यात येणार असल्याने ज्या अधिका-यांच्या गोपनीय अहवालासंदर्भात अशी कार्यवाही पूर्ण झालेली आहे, अशा अधिका-यांच्या नावाची शिफारस करण्यात यावी. संपूर्ण कालावधीचे गोपनीय अहवाल किंवा ना-अहवाल प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. ज्या अधिका-यांचा संपूर्ण कालावधीचा गोपनीय अहवाल उपलब्ध नसेल, अशी नावे त्यांचे संपूर्ण अहवाल प्राप्त करुन घेतल्याशिवाय प्रस्तावात अंतर्भूत करु नयेत.

वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. अरजा-२४०२/२५/सेवा-८, दि. ०७.१०.२००२ नुसार मागील १० वर्षाच्या कालावधीत विशेष असाधारण रजेवर असलेल्या अधिका-यांचे गोपनीय अभिलेख विचारात घेताना त्यांच्या विशेष असाधारण रजेचा कालावधी वगळून दि. ३१.०३.२०१६ पर्यंतचे मागील सलग एकूण १० वर्षाच्या कर्तव्य कालावधीचे गोपनीय अहवाल विचारात घेण्यात यावेत.

तसेच अत्युत्कृष्ट गोपनीय अहवालांची गणना करताना एखाद्या गोपनीय अहवाल वर्षात ६ महिने अथवा त्यापेक्षा जास्त कालावधीचा गोपनीय अहवाल उपलब्ध असेल तरच सदर गोपनीय अहवालाची जी प्रतवारी असेल ती संपूर्ण वर्षाची प्रतवारी समजण्यात यावी. जर ६ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीची NRC (रजा/वैध कारणास्तवची ना अहवाल प्रमाणपत्रे) असेल तर त्या संपूर्ण वर्षाची प्रतवारी NRC समजण्यात यावी.

(ii) १० पैकी किमान ९ वर्षाचे गोपनीय अहवाल अत्युत्कृष्ठ असणा-या अधिका-यांची शिफारस करण्यात यावी.

(iii) मागील किमान १० वर्षाच्या गोपनीय अभिलेख्यांचा सचिव दर्जाच्या अधिकाऱ्याने प्रमाणित केलेला इंग्रजी अनुवाद (अधिका-यांच्या स्वंयमुल्यांकनासह) स्वतंत्र नमुन्यात संबंधित कालावधीच्या गोपनीय अहवालासोबत जोडावा.

(iv) मूळ गोपनीय अहवालाचा तंतोतंत अनुवाद करुन देण्यात यावा.

(v) तसेच गोपनीय अहवाल प्रतिवेदन / पुनर्विलोकन करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव, पदनाम (दिनांकासहीत) नमूद करण्यात यावे.

(vi) कमी कालावधीकरीता ना-अहवाल प्रमाणपत्र (इंग्रजीत) जोडण्यात यावे.

(vii) गोपनीय अहवालांच्या मूळ प्रती नस्तीमध्ये लावण्यात याव्यात. छायांकित प्रती ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

(viii) गोपनीय अहवाल नस्त्या वर्षनिहाय पताका लावून पाठविण्यात याव्यात.

(ix) मंत्रालयात झालेल्या दिनांक २१.०६.२०१२ रोजीच्या आगीच्या दुर्घटनेमध्ये गोपनीय अहवाल नस्त्या/गोपनीय अहवाल नष्ट झालेला असल्यास, साप्रवि च्या दिनांक १९.०७.२०१२ रोजीच्या शासन निर्णयानुसार, गोपनीय अहवालाची पुनर्बांधणी करुन, गोपनीय अहवाल पाठवावेत व पुनर्बांधित गोपनीय अहवालाचा तंतोतंत इंग्रजी अनुवाद करुन पाठवावा.

3/17

(९) मागील दोन वर्षांमध्ये असे निदर्शनास आलेले आहे की, विभागाकडून शिफारस करण्यात आल्यानंतर काही अधिकारी shortlisting च्या निवड प्रक्रियेच्या अनुषंगाने लेखी परीक्षा व मुलाखतीकरिता बोलविण्यात आल्यानंतर त्यास इच्छुक नसल्याचे कळवितात किंवा shortlisting च्यावेळी उपस्थितच राहत नाहीत. यास्तव जे अधिकारी भाप्रसेमध्ये निवडीने नियुक्तीकरिता इच्छुक आहेत, अशाच अधिका-यांच्या नावाची शिफारस करण्याची विभागाने दक्षता घ्यावी.

३. वरीलप्रमाणे प्रस्ताव पाठवितांना भारतीय प्रशासन सेवा (निवडीने नियुक्ती) विनियम १९९७ मधील तरतूदी कटाक्षाने विचारात घेऊन परिपूर्ण प्रस्ताव **कोणत्याही परिस्थितीत दिनांक ३१.०३.२०१७ पर्यंत साप्रवि कार्यासन -१० मध्ये पाठविण्यात यावा, ही विनंती**. या तारखेनंतर आलेले प्रस्ताव विचारात घेण्यात येणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच *आपल्या विभागात हा विषय हाताळणा-या संबंधित सह / उप / अवर सचिवांचे नाव (Nodal Officer), दूरध्वनी / विस्तार क्रमांक सुध्दा कृपया या विभागास कळविण्यात यावेत,* **सदर प्रस्तावामध्ये त्रुटी आढळून आल्यास संपूर्ण प्रस्ताव विभागास परत करण्यात येईल.**

**विहित मुदतीपर्यंत परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे आपल्या विभागातील अधिका-यांचा विचार न झाल्यास त्यांची संपूर्ण जबाबदारी आपल्या विभागाची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.**

आपली,

(स्वाक्षरी) ०४।०२।२०१७

( स.रि.बांदेकर-देशमुख )
उप सचिव, महाराष्ट्र शासन
Tel. 22023461,Fax 22874955
Email:-ja-gad-mah@nic.in

सहपत्र : वरीलप्रमाणे

२/२/१७

५ प

## परिशिष्ट - अ

Eligibility of the officer to be selected under Indian Administrative Service (Appointment by Selection) Regulation, 1997. (Rule 4)

1. Must have **Outstanding merit and ability.**

2. Must holds **a Gazetted Post** in a Substantive capacity.

3. Must have completed **not less than 8 years** of continuous service under the State Government **on 1st January, 2016,** on any post which has been declared **equivalent to the post of Deputy Collector** in the State Civil Services.

4. Must have not attained the age **of 56 years on 1st January, 2016.**

*********************************************

3/17

**ANNEXURE-3.1**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**

No.

Department,

Mantralaya, Mumbai- 400 032.

Date:

**Particulars of Non-State Civil Service officers who are eligible for consideration for Selection to the IAS (Select List 2016)**

| Sr. No. | Name of the Department | Name of the Officer | Date of Birth and age as on 1.1.2016 | Educational Qualification | Date from which holding Gazetted post continuously which has been declared equivalent to the post of Deputy Collector in the State Civil Service and No. of Years of service put in as on 1.1.2016 [with present pay scales] | Date of confirmation in Gazetted post continuously which has been declared equivalent to the Post Deputy Collector in the State Civil Service | Whether integrity certificate issued. [As per the enclosed format] | Whether D.E. is pending | Whether belongs to SC/ST | Whether C.R. file is upto date. [upto 2015-2016 | Whether There are any adverse entries in the CRs if yes, in which year. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

**Addl. Chief Secretary / Principal Secretary / Secretary to the Government**

99/5
4/17

परिशिष्ट -४. १

ANNEXURE-4.1

GOVERNMENT OF MAHARASHTRA

No.

Department,
Mantralaya, Mumbai - 400 032.
Date:

(A) DETAILS OF DISCIPLINARY PROCEDINGS PENDING AGAINIST ELIGIBLE OFFICERS

| Sr. No. | NAME OF OFFICER (S) | DATE OF ISSUE OF CHARGESHEET TO THE OFFICERS | BRIEF FACTS AND NATURE OF CHARGES | PRESENT STATUS |
|---|---|---|---|---|
| 1. | | | | |
| 2. | | | | |
| 3. | | | | |
| 4. | | | | |
| 5. | | | | |

(B) DETAILS OF CRIMINAL PROCEEDINGS PENDING AGAINST ELIGIBLE OFFICERS.

| Sr. No. | NAME OF OFFICER (S) | DATE OF FILLIG OF CHARGESHEET BEFORE THE COURT | BRIEF FACTS AND NATURE OF CHARGES | PRESENT STATUS |
|---|---|---|---|---|
| 1. | | | | |
| 2. | | | | |
| 3. | | | | |
| 4. | | | | |
| 5. | | | | |

Addl. Chief Secretary / Principal Secretary / Secretary
to the Government

5/17

परिशिष्ट - ४.२

**ANNEXURE-4.2**

***GOVERNMENT OF MAHARASHTRA***

No.

Department,
Mantralaya, Mumbai- 400 032.
Date:

**DETAILS OF PENALTIES IMPOSED ON ELIGIBLE OFFICERS DURING THE LAST 10 YEARS**

| Sr. No. | Name of the Officer (S) | YEAR IN WHICH OFFENCE IS COMMITTED | DATE OF ISSUE OF CHARGESHEET | DATE OF ON WHICH PENALTY IMPOSED | NATURE OF PENALTY | PERIOD OF CURRENCY OF THE PENALTY AND THE DATE WHEN THE CURRENCY OF PENALTY WILL BE OVER | WHETHER ANY APPEAL HAS BEEN FILED AND IF SO WHETHER THERERE IS ANY INTERIM STAY / STAY. | REMARKS |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

**Addl. Chief Secretary / Principal Secretary / Secretary**
**to the Government**

6/17

१५६

परिशिष्ट - ५

**ANNEXURE-5**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**

No.

Department,
Mantralaya, Mumbai - 400 032.
Date:

## FORMAT FOR INTEGRITY CERTIFICATE

A. Format for certifying the Integrity Certificate

**Dated:**

## INTEGRITY CERTIFICATE

The State Government certified the integrity of following officers with reference to the entries in his/their Annual Confidential Reports:-

| Sr.No. | Name of (S/Shri) | Serial No.In the Statement |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

## FORMAT FOR INTEGRITY CERTIFICATE

B. Format for withholding the Integrity Certificate

**Dated:**

## INTEGRITY CERTIFICATE

The State Government Withholds the integrity of following officer(s) for the reasons indicated against each:-

| Sr.No. | Name of (S/Shri) | Serial No. in the Statement | Reasons (in brief) for withholding the integrity certificate |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

**Addl. Chief Secretary / Principal Secretary / Secretary to the Government**

7/17

परिशिष्ट - ६

ANNEXURE-6

GOVERNMENT OF MAHARASHTRA

No.

Department,
Mantralaya, Mumbai - 400 032.
Date:

**Certificates regarding communication of Adverse remarks in respect of eligible officers**

(i) Adverse remarks in the character rolls of the following eligible officers have not been communicated by the State Government to the officers concerned

| Sr. No | Name of the Officer | Sr.No.in the statement | Period |
|---|---|---|---|
| | | | |

(ii) Adverse entries in respect of the following eligible officers have been communicated, but no representation have been so far received from the officer concerned but the time limit to representation is not yet over.

| Sr. No | Name of the Officer | Sr.No.in the statement | Period |
|---|---|---|---|
| | | | |

(iii) Representation against adverse entries in respect of the following officers have been received within the stipulated time, but the decision of the State Government is yet to be taken.

| Sr. No | Name of the Officer | Sr.No.in the statement | Period |
|---|---|---|---|
| | | | |

**Addl. Chief Secretary / Principal Secretary / Secretary to the Government**

8/17

**ANNEXURE-7**

## GOVERNMENT OF MAHARASHTRA

No.

Department,

Mantralaya, Mumbai – 400 032.

Date:

### Statement of ACRs furnished to the Commission.

| Sr. | Name of Officers (S/Sh.) | period of ACR (preceding 10 years) (Separate row for each part ACR) e.g. 2006-07 to 2015-16 | Whether Available | | | Whether ACR is duly reported /reviewed / accepted ? | | Whether the ACR is vaild as per ACR Rules fo State | | If the ACR written in Regional language, whether English translation (including the self assessment) duly attested by an officer not below the rank of Secretary to State Govt. added in the dossier? | | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | If yes, mark (✓) | If no, whether No Report Certificate (NRC) with valid @ reasons addedd) | | If yes, mark (✓) | If no, indicate the deficiency with reasons e.g. not reviewed etc. | If yes, mark (✓) | If no, indicate reasons | If yes, mark (✓) | If no, indicate reasons | |
| | | | | If yes, mark (✓) | If no, indicate reasons | | | | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |

@ Valid reasons as per DOPT letter No. F.14015/7/88-AIS(I) dated 22.07.1988.

- The State Government is required to furnish the complete ACR dossier of the officer. The ACRs for preceding five years may be duly flagged. **If some ACRs are not written and NRC added, preceding ACRs may be flagged and details furnished as above.**
- No photocopy of ACR is accepted. In exceptional circumstances, if a photocopy is furnished, it should be duly attested and reasons for not sending the original ACR may be indicated.
- The ACRs furnished to the Commission should be minutely scrutinized and furnished to the Commission after rectifying the deficiencies.
- The validity of the ACRs furnished to the Commission may be checked by the State Government in terms of the ACR rules of the State Govt., if any. The validity of the UN Report/Special Report, etc., if any, as per ACR Rules of State Government may be indicated clearly.

( )

Name__________

Designation__________

**Addl. Chief Secretary / Principal Secretary / Secretaryto the Government**

9/17

29/4

**ANNEXURE-8**

GOVERNMENT OF MAHARASHTRA

No.

Department,
Mantralaya, Mumbai - 400 032.
Date:

**A Statement showing Court Cases and Court orders having bearing on the Select List**

ग

| Sr No. | Name of Applicants (S/Shri) | Case No. | Name of Court | Date of Orders and Compliance Date | Directions (in brief) | Whether appeals have been filed and if so whether stay orders have been obtained | Implications on the current Select List | Whether a copy of the Orders has been enclosed | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

Addl. Chief Secretary / Principal Secretary / Secretary
to the Government

10/17

231/प

परिशिष्ट -

## DECLARATION

I hereby declare that I have not more than one wife living.

( )

**Place :**

**Date:**

## DECLARATION

I hereby declare my unconditional willingness for appointment to the INDIAN ADMINISTRATIVE SERVICE in case of selection.

I also further declare that I agree to terminate my lien in the post held by me substantively in the Non-State Civil Service on eventual substantive appointment to the INDIAN ADMINISTRATIVE SERVICE.

( )

**Place :**

**Date:**

11/17

बिगर राज्य नागरी सेवेतून (Non-SCS) भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्तीच्या शिफारशीसाठी पात्रता निकष (Benchmark Criteria) विहित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः एआयएस-१३१७/प्र.क्र.४५/२०१७/दहा,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२,
तारीख: ०४.०२.२०१७

**संदर्भ:-**

१) वित्त विभाग शासन निर्णय क्र. अरजा-२४०२/२५/सेवा-८, दि. ०७.१०.२००२
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एआयएस १३१०/प्र.क्र.५६३/२०१०/दहा, दि.०७.०९.२०११,
३) केंद्र शासन कार्मिक व प्रशिक्षण विभाग, नवी दिल्ली यांचे कार्यालयीन ज्ञापन क्र. १४०१५/३०/ २०१५-AIS-I, दि. २०.०३.२०१५
४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एआयएस १३१६/प्र.क्र.५४/२०१६/दहा, दि.०८.०२.२०१६

**प्रस्तावना:-**

भारतीय प्रशासन सेवेत नियुक्तीचे खालीलप्रमाणे तीन मार्ग विहित करण्यात आले आहेत,-

१) स्पर्धा परिक्षेद्वारे सरळसेवेने नियुक्ती (Appointment by Competitive Examination)
२) राज्य नागरी सेवेतून पदोन्नतीने नियुक्ती (Appointment by Promotion)
३) बिगर राज्य नागरी सेवेतून निवडीने नियुक्ती (Appointment by Selection)

उपरोक्त मार्गापैकी वरील अ.क्र. ३ येथील नियुक्ती, भाप्रसे (निवडीने नियुक्ती) विनियम, १९९७ मधील तरतूदीनुसार केली जाते. या विनियमातील नियम ४ (iii) प्रमाणे पात्रता धारण करणाऱ्या अधिकाऱ्यांमधून १:५ (१ पद ५ अधिकारी) या प्रमाणात अधिकाऱ्यांची शिफारस निवडीने नियुक्तीकरीता संघ लोकसेवा आयोगाकडे करणे आवश्यक आहे.

विनियमात विहित केलेल्या अत्युकृष्ट गुणवत्ता व क्षमता या निकषानुसार, निवडीसाठी अधिकाऱ्यांची शिफारस करणे अभिप्रेत आहे. त्यानुसार अधिकाऱ्यांना निवडीने नियुक्तीसाठी शिफारस करण्याकरीता संदर्भाधीन क्र. २ येथे नमूद दि. ०७.०९.२०११ च्या शासन निर्णयान्वये निकष विहित करण्यात आले होते. केंद्र शासनाच्या दि.२०.०३.२०१५ च्या कार्यालयीन ज्ञापनान्वये भाप्रसेमध्ये निवडीने नियुक्ती संदर्भात करण्यात आलेली सुधारणा आणि अन्य बाबींच्या अनुषंगाने उपरोक्त नमूद दि. ०७.०९.२०११ च्या शासन निर्णयामध्ये

सुधारणा करण्यात आली असून सन २०१५ च्या निवडसूचीसाठी बिगर राज्य नागरी सेवेतून भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्तीसाठी दि.०८.०२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित पात्रता निकष निर्गमित करण्यात आले होते.

सन २०१६ च्या निवडसूचीसाठी बिगर राज्य नागरी सेवेतून भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्तीसाठी संघ लोकसेवा आयोगाकडे शिफारस करण्याकरीता खालीलप्रमाणे पात्रता निकष (Bench Mark Criteria) विहीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

**शासन निर्णय:-**

भाप्रसे (निवडीने नियुक्ती) विनियम, १९९७ मधील नियम ४ (iii) नुसार निवडीने नियुक्तीसाठी अधिकाऱ्याने पुढीलप्रमाणे पात्रता धारण करणे आवश्यक आहे.

अ) अत्युत्कृष्ट गुणवत्ता व क्षमता,

ब) राजपत्रित पदावर स्थायीकरण झालेले असावे,

क) उप जिल्हाधिकारी या पदाशी समकक्ष घोषित पदावर निवडसूचीच्या वर्षाच्या दि. ०१ जानेवारी रोजी (दि.०१.०१.२०१६) किमान ८ वर्षे सेवा झालेली असावी.

ड) निवडसूचीच्या वर्षाच्या दि. ०१ जानेवारी रोजी (दि.०१.०१.२०१६) त्याचे वय ५६ वर्षांपेक्षा जास्त नसावे.

२. उपरोक्त अ.क्र. अ), ब), क) व ड) येथील पात्रता धारण करणाऱ्या विचारक्षेत्रातील अधिकाऱ्यांपैकी ज्या अधिकाऱ्यांच्या १० गोपनीय अभिलेखांपैकी किमान ९ गोपनीय अभिलेख अत्युत्कृष्ट दर्जाचे आहेत असा अधिकारी वगळला जाणार नाही याची संबंधित प्रशासकीय विभागाने दक्षता घ्यावी. तसेच गोपनीय अहवालांची गणना करताना खालील कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

१) सन २०१६ या निवडसूची वर्षाकरीता ३१ मार्च, २०१६ पर्यंतचे मागील सलग १० वर्षाचे सर्व संस्करण पूर्ण होऊन अंतिम झालेले गोपनीय अभिलेखच विचारात घेण्यात यावेत. अशा मागील १० वर्षांपैकी ९ किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीचे गोपनीय अभिलेख अत्युत्कृष्ट असणे आवश्यक आहे.

२) वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. अरजा-२४०२/२५/सेवा-८, दि. ०७.१०.२००२ नुसार मागील १० वर्षाच्या कालावधीत विशेष असाधारण रजेवर असलेल्या अधिकाऱ्यांचे गोपनीय अभिलेख शॉर्ट लिस्टींगकरीता विचारात घेताना त्यांच्या विशेष असाधारण रजेचा कालावधी वगळून ३१ मार्च, २०१६ पर्यंतचे मागील सलग एकूण १० वर्षाच्या कर्तव्य कालावधीचे गोपनीय अहवाल शॉर्ट लिस्टींगकरीता विचारात घेण्यात यावेत.

13/17

३) तसेच अत्युत्कृष्ट गोपनीय अहवालांची गणना करताना एखाद्या गोपनीय अहवाल वर्षात ६ महिने अथवा त्यापेक्षा जास्त कालावधीचा गोपनीय अहवाल उपलब्ध असेल तरच सदर गोपनीय अहवालाची जी प्रतवारी असेल ती संपूर्ण वर्षाची प्रतवारी समजण्यात यावी. जर ६ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीची NRC (रजा/वैध कारणास्तवची ना अहवाल प्रमाणपत्रे) असेल तर त्या संपूर्ण वर्षाची प्रतवारी NRC समजण्यात यावी.

३. बिगर राज्य नागरी सेवेतून भाप्रसेमध्ये निवडीने नियुक्तीकरिता सन २०१६ च्या निवडसूचीकरिता २ पदे उपलब्ध असल्यामुळे संघ लोकसेवा आयोगास १० अधिका-यांची नांवे पाठविणे आवश्यक आहे. तद्नुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची काळजीपूर्वक छाननी केल्यानंतर, संघ लोकसेवा आयोगाने बिगर राज्य नागरी सेवेतून भारतीय प्रशासन सेवेत नियुक्तीकरीता विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या आधारे, तसेच या मार्गदर्शक तत्वांमध्ये संघ लोकसेवा आयोगाने बदल केल्यास त्याप्रमाणे आस्थापना मंडळ क्र. १ मार्फत (लेखी परीक्षा, सेवा ज्येष्ठता, गोपनीय अहवाल, व मुलाखतीच्या आधारे) १:५ (१ पद : ५ अधिकारी) याप्रमाणे निवडीने नियुक्तीकरीता संघ लोकसेवा आयोगास अधिकाऱ्यांची शिफारस करेल. सदर शिफारशी करण्यासाठी Shortlisting करिता आस्थापना मंडळ -१ मार्फत खालीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबिण्यात येईल.

३.१ Short Listing करिता १०० गुणांची विभागणी- २० गुण लेखी चाचणी, १० गुण सेवा ज्येष्ठता, ५० गुण गोपनीय अहवालांकरिता आणि २० गुण मुलाखतीकरिता अशी राहील.

३.२ उपरोक्त प्रमाणे मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडून प्राप्त झालेल्या विहित पात्रता निकष पूर्ण करणा-या सर्व अधिका-यांना लेखी परीक्षेकरिता बोलविण्यात येईल.

३.३ लेखी परीक्षा आणि सेवाकालावधीचे गुण एकत्रित करुन गुणानुक्रमानुसार पहिल्या ३० अधिका-यांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.

३.४ उपरोक्त ३० अधिका-यांचे लेखी परीक्षा, सेवाकालावधीचे गुण, गोपनीय अहवाल आणि मुलाखतीचे गुण एकत्रित करुन गुणानुक्रमानुसार पहिल्या १० अधिका-यांच्या नावाची शिफारस संघ लोकसेवा आयोगास करण्यात येईल.

४. भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्तीच्या शिफारशीकरीता विहीत निकष पूर्ण करणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागामार्फत, मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून मागविण्यात यावेत. या निवड प्रक्रीयेकरीता संघ लोकसेवा आयोगाने वेळापत्रक विहीत केले असल्याने, त्यानुसार प्रक्रीया वेळेत पार पाडण्याच्या दृष्टीने, दि.३१.०३.२०१७ पर्यंत साप्रवि, कार्यासन १० मध्ये प्राप्त होणारे प्रस्तावच विचारात घेण्यात येतील.



14/17

५. उपरोक्त पात्रता निकष (Bench Mark Criteria) हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून होण्याऱ्या प्रक्रियेस भावी परिणामाने (With Prospective Effect) लागू होईल.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०२०४१५५२२८५३०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mukesh Khullar

Digitally signed by Mukesh Khullar

(मुकेश खुल्लर)
प्रधान सचिव (सेवा)

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
४. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
६. महालेखापाल, मुंबई/नागपूर,
७. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
८. सचिव, कार्मिक व प्रशिक्षण विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली,
९. सचिव, संघ लोकसेवा आयोग, नवी दिल्ली,
१०. सर्व मंत्र्यांचे खाजगी सचिव,
११. सर्व मंत्रालयीन विभाग,
१२. निवड नस्ती.

15/17

3 ५ | ५ ·

# NOTIFICATION

No.AIS-1304/C.R.491/2004/X.

General Administration Department,
Mantralaya, Mumbai -400 032.
Dated: 24th December, 2004.

The Government of India, Ministry of Personnel, Public Grievances and Pensions, Department of Personnel & Training, New Delhi vide Notification No.14015/53/96-AIS(I), dated 31st December, 1997 have amended the Indian Administrative Service (Appointment by Selection) Regulations, which have come into effect with effect from 1.1.1998. Regulation 4 of the Regulations ibid reads as follows :-

4. State Government to send proposals for consideration of the Committee.

(1) The State Government shall consider the case of a person not belonging to the State Civil Service but serving in connection with the affairs of the State who.

(i) is of outstanding merit and ability, and

(ii) holds a gazetted post in a substantive capacity.

(iii) and has completed not less than 8 years of continuous service under the State Government on the first day of January of the year in which his case is being considered in any post which has been declared equivalent to the post of Deputy Collector in the State Civil Service and propose the person for consideration of the Committee. The number of persons proposed for consideration of the Committee shall not exceed five times the number of vacancies proposed to be during the year.

2. In fulfillment of the requirements of the above provisions and also in order to meet the eligibility conditions with regards to the recommendations made in respect of the Non-SCS Officers, in exercise of the power conferred by sub regulations (iii) of Regulations 4(1) of the Indian Administrative Service (Appointment by Selection) Regulations, 1997, the Government is pleased to order that, barring three services viz. (1) State Police Service (2) State Forest Service and (3) Judicial Service, all Group 'A' posts (previously Class I posts) in all the Departments under the Government of Maharashtra, are declared equivalent to the post of Deputy Collector in the State Civil Service, for the limited purpose specified in Regulation ibid.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

Sd/-
(Seema Vyas)
Deputy Secretary to the Government

********************

P.T.O.

C:\...\My Documents\...\NON_ias_2004-Note.doc

26/17

No.AIS-1304/C.R.491/2004/X,

General Administration Department,
Mantralaya, Mumbai - 400032.
Dated: 24th December, 2004.

Copy for information & necessary action :-

1. The Secretary to Government of India, Ministry of Personnel, Public Grievances and Pensions, Department of Personnel & Training, New Delhi-110 001
2. The Secretary, Union Public Service Commission, New Delhi,
3. The Secretary to the Governor,
4. The Principal Secretary to the Chief Minister,
5. The Secretary to the Deputy Chief Minister,
6. The Principal Secretary [Personnel], General Administration Department,
7. All Additional Chief Secretary to the Government of Maharashtra,
8. All Principal Secretary to the Government of Maharashtra,
9. All Secretary to the Government of Maharashtra,
10. All Departments in Mantralaya,
11. All Head of the Departments,
12. All Divisional Commissioners,
13. All Collectors,
14. All Chief Executive Officers, Zilla Parishad,
15. All Desk in General Administration Department,
16. The Manager, Government Central Press, Charni Road, Mumbai,
    He is requested to publish above notification in Government Gazette, Part-1 and forward 10 copies of the same to this department.
17. Select file.

[P.B. Dandekar]
Under Secretary to the Government.

17/17